**महाराष्ट्र शासन**

**भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर**

**( प्री - आय. ए. एस. ट्रेनिंग सेंटर )**

**मंडलिक पार्क (राजारामपुरी ) समोर, कोल्हापूर - ४१६००४**

दूरध्वणी क्रमांक ०२३१-२५२८३६६ वेबसाईट : pitckolhapur.org.in ई- मेल : pitckop१९८५@gmail.com

# केंद्रीय लोकसेवा आयोग २०२० परीक्षेकरीता प्रशिक्षण

केंद्रीय लोकसेवा आयोग २०२० परीक्षेकरीता भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांचे मार्फत पुर्णवेळ प्रशिक्षण देण्याकरीता प्रवेश परीक्षा **दि. १७.११.२०१९** रोजी घेण्यात येणार आहे.

**१. प्रवेश क्षमता : एकुण ८० पैकी -**

| | | |
|---|---|---|
| १. | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर. | ६० |
| २. | डॉ. बाबासाहेब अंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे BARTI व्दारा अनुदानीत. | १० |
| ३. | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई MINORITY व्दारा अनुदानीत. | १० |

**२. प्रवेश परीक्षेचे स्वरूप :-** प्रवेश परीक्षा २०० गुणांची असेल त्यात Section - I, सामान्य अध्ययन १०० गुणांचा असेल व Section - II सी - सॅट १०० गुणंचा, असेल UPSC नागरी सेवा परीक्षा २०१५ नुसार गुणवत्ता यादी Section - I सामान्य अध्ययन या भागातील गुणांवर आधारीत असेल. त्याकरीता Section - II सी - सॅट भागामध्ये किमान ३३% गुण आवश्यक आहेत. प्रश्नांचे स्वरूप वस्तुनिष्ठ असुन चुकीच्या उत्तराकरीता नकारात्मक गुण पध्दती राहील. (चुकीचे उत्तरकरिता प्रश्नांच्या १/३ वजा केले जातील).

**३. वसतिगृह प्रवेश मर्यादित असुन गुणवत्ता व प्रचलित नियमानुसार होतील.**

४. **प्रवेश परीक्षा आर्हता:-** अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.
**(ब)** उमेदवाराचे वय ०१ ऑगष्ट २०२० रोजी २१ ते ३२ वर्ष ( ३ वर्ष इमाव / वि.जा.भ.जा. / वि.मा. प्र./EWS/SEBC व ५ वर्ष अनुसुचित जाती / जातीसाठी शिथिलक्षम आहे). **(क)** उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certification) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस सिमाभागातील रहिवासी असल्यास त्याची / त्याच्या अर्जात तो / ती पात्रता परीक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सिमाभागातील गाव किंवा शहरातील संस्थेमधुन उत्तीर्ण झाल्याचे नमुद करणे आवश्यक असेल. तसेच अर्जासोबत संबंधित विद्यार्थी / विद्यार्थीनी पालक महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सिमा भागातील रहिवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थीपात्रता परीक्षा संस्थेतून उत्तीर्ण झाल्याचे व त्याची / तिची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांचे प्रमापत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच इयत्ता १० ची परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (ड) या केंद्रामध्ये प्रारंभिक अथवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही. **(इ)** सदर प्रशिक्षण पूर्णवेळ असल्यामुळे अन्यत्र नोकरी अथवा शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेता येणार नाही. **(फ)** वैद्यकीय पदवी धारकांनी Internship पूर्ण करणे आवश्यक आहे.

**५. प्रवेश परीक्षेच्या अर्जासंबंधी सविस्तर माहिती www.pitckolhapur.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

सही/-
डॉ. अंजली पाटील
संचालक,
भारतीय प्रशासकीय सेवापूर्व
प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर